स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड , या विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे
विद्याशाखेंअंतर्गत
“इतिहास” विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोध आराखडा

नाशिक शहराचा शैक्षणिक इतिहास : एक अभ्यास

(इ.स.१९०० ते इ.स.२०००)

History of Education in Nashik City :- A Study

(1900 to 2000)

संशोधक
श्री.हेमंत सुभाष भावसार
(एम.ए., सेट)
नाशिक .

मार्गदर्शक
डॉ.डी.डी. कोल्हेकर
(एम.ए.,पीएच.डी.) , इतिहास विभाग प्रमुख
कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमरी
ता.उमरी,जिल्हा :-नांदेड .

१. प्रस्तावना :-

भारत देश विविधतेने नटलेला आहे. जगाच्या दृष्टीने भौगोलिक संपन्नता फार मोठी लाभलेली आहे. देशात महाराष्ट्राचा अग्रक्रम लागतो. महाराष्ट्राचा भूगोल व इतिहास फारच सुंदर आहे. उंच उंच डोंगर, खोल खोल द-या, पर्वतरांगा आणि विविध पिके आणि प्राचीन इतिहास फार मोठा आहे. महाराष्ट्रातील नाशिक शहराला पण प्राचीन इतिहास लाभलेला आहे.

पुरातन काळापासून नाशिक शहर व परिसर विविध नावांनी ओळखले जात. जनस्थान, त्रिकंटक,गुलशनाबाद, नासिक आणि आता विद्यमान नाशिक अशी पाच नावे आहे. नाशिक प्राचीन काळापासून धार्मिक स्थळ मानले जाते. रामायणात नाशिकमधील पंचवटी येथे "श्रीरामाचे" वास्तव होते असा उल्लेख आहे. मोगलांच्या काळात नाशिकला "गुलाबांचे शहर" म्हणत , म्हणून त्या काळात नाशिक **"गुलशनाबाद"** म्हणून ही ओळखले जात असे.

नाशिक हे नाव कसे पडले ह्या बाबत दोन मत प्रवाह आहे. "नऊ शिखरांचे शहर" म्हणून "नव शीख" व नंतर नाशिक असा एक प्रवाह आहे. तसेच दुसरा संदर्भ हा रामायणाशी निगडीत आहे . राम,सीता व लक्ष्मण हे नाशिक मधील पंचवटी येथे वनवासात असताना "शूर्पणखा" या रावणाच्या बहिणीचे नाक (संस्कृत भाषेत नाकाला – नासिका) म्हणतात , लक्ष्मणाने कापले त्यावरून नासिक व कालांतराने नाशिक हे नाव रूढ झाले.

भारतातल्या चार कुंभमेळ्यापैकी सिहस्थ कुंभमेळ्याचे क्षेत्र नाशिक आहे.नाशिक येथे दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. नाशिक येथील गोदावरी घाट प्रसिद्ध आहे . गोदावरी नदीला नाशकात **"दक्षिणगंगा"** म्हणतात . नाशिकची भौगोलिक , आर्थिक,धार्मिक,राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक या दृष्टीने स्वतःची खास ओळख आहे . नाशिक कालची मंत्रभूमी आज यंत्रभूमी झालेली आहे.मुंबई – पुणे-नाशिक या सुवर्ण त्रिकोणातील हे महत्त्वाचे शहर आहे. १६४४ मध्ये समर्थ रामदास पंचवटीत एका राम उपासकाला लिहलेल्या पत्रात म्हणतात.

जनस्थान गोदातटी | परमपावन पंचवटी

येथे घडली कृपादृष्टी | रघुरामरायाची

समर्थानी नाशिकचा उल्लेख जनस्थान म्हणून केल्याचे दिसते.त्याचं काळात छत्रपती शिवाजी महाराज नाशिकचा उल्लेख नासिक असा करतात . श्री गजानन महाराज काळाराम मंदिरात आले व तेथे नृसिह

महाराज (गोपालदासजी महाराज) यांना भेटले.या भेटी संदर्भात श्री.गजानन विजय ग्रंथात अध्याय क्र. ११ मध्ये ते लिहितात.

वंदिला माय निलांविका | तेही गहणी निवृत्तीनाथ देखा ||

तेथून आपले नाशिक | गोपालदास भेटावया |८४ ||

पौराणिक काळापासून धार्मिक खाणाखुणा मधून नाशिक जसे दिसते तसेच ते ऐतिहासिक खाणाखुणातून आपली ओळख स्पष्ट करते .पतंजली या भाष्य लेखकाने या शहराचा उल्लेख "नासिक" या नावाने केला आहे.तर इ.स.पूर्व १५० टालेमी यांनी नाशिक शहराची नोंद घेतली आहे. इ.स.पूर्व ५०० मध्ये वराहमिहिर याने नाशिक हा हिंदुस्थानचा भाग आहे असा उल्लेख केला आहे.

मंत्रभूमीकडून तंत्र भूमीकडे चाललेल्या नाशिकने आपल्या इतिहासाचे संवर्धन केले आहे. नाशिक एक देवभूमी आहे व अनंत काळापासून तिची ओळख कोणीही बदलू शकले नाही .इ .स. १५० मध्ये भारतात आलेल्या टालेमी या इजिप्शीयन प्रवाशाने "नाशिक धर्मपीठ" असल्याचा उल्लेख केला आहे .

इ.स.१९०० मध्ये स्वातंत्रवीर सावरकरांनी मित्रमेळा संघटनेची स्थापना येथेच केली. क्रांतिकारकांचे जणू तीर्थ ठरलेल्या या शहरात विजयानंद थीएटर येथे अनंत कान्हेरे या महाराष्ट्राच्या सुपुत्राने जक्सनचा वध केला.सुप्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर व ज्ञानपीठ विजेते वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची हि कर्मभूमी होय. धार्मिक ऐतिहासिक महत्व असणारा हा जिल्हा अलीकडच्या काळात एक अग्रगण्य " औद्योगिक जिल्हा" बनू पाहत आहे.

ज्या प्रमाणे नाशिकला भौगोलिक , आर्थिक,धार्मिक,राजकीय, व सांस्कृतिक महत्व लाभले आहे त्याचप्रमाणे शैक्षणिक वारसा पण फार मोठा लाभला आहे. नाशिकमधील २० व्या शतकातील शैक्षणिक प्रवास व त्याचा समाजावर होणारा परिणाम यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे . शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे शिक्षणाचे महत्व जाणून अनेक समाजसुधारकांनी सामान्य लोकांना ज्ञानी बनविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. महात्मा फुले , सावित्रीबाई फुले ,कर्मवीर भाऊराव पाटील , डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी केशव धोंडो कर्वे अशा अनेक महान व्यक्तींनी आपले संपूर्ण आयुष्य या कमी खर्च घातले. शिक्षणामुळे कुटुंबाची प्रगती होते कुटुंबाची प्रगती झाली म्हणजे समाज ,तालुका , जिल्हा व देशाची प्रगती होते. इतर घटनेप्रमाणे शिक्षणाचा फार मोठा परिणाम समाजावर झालेला आपणास पहावयास मिळतो. इतिहासात देखील आपण पाहतो की अनेक समाजसुधारक

विविध पदावरील वरिष्ठ अधिकारी यांनी अनेक प्रयत्न केले व त्या मुळे आशियाखंडातील झपाट्याने प्रगती करणारा भारत हा एकमेव देश आहे शोध आणि तंत्रज्ञानामुळे दिवसेन दिवस प्रगती होत आहे देशाची महासत्तेकडे वाटचाल सुरु आहे.

नाशिक राजकीय, सामाजिक , आर्थिक, सांस्कृतिक, आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्वाचे शहर आहे.या शहराची ओळख वेगळी आहे पुणे मुंबई आणि नाशिक असाच उल्लेख येतो. औद्योगिक प्रगतीमुळे शैक्षणिक विकास ही चांगला झालेला दिसतो.

नाशिकजिल्हामध्ये २ विद्यापीठे , १०३ महाविद्यालय , २८८५ प्राथमिक शाळा व २५० माध्यमिक शाळा आहेत. सध्या प्राथमिक ,माध्यमिक, व्यवसायिक तसेच उच्च व तंत्र शिक्षणाच्या सुविधांचा विस्तार वाढत आहे. १ वैद्यकीय , ३ आयुवेदिक, १६ व्यवस्थापन व अभियांत्रिकी,महाविद्यालये आहेत . गोखले एज्युकेशन सोसायटी , मराठा विद्याप्रसारक मंडळ , नाशिक शिक्षण प्रसार मंडळ , नाशिक एज्युकेशन सोसायटी, सेन्ट्रल हिंदू एज्युकेशन सोसायटी , या जुन्या पिढीतील नावाजलेल्या शिक्षण संस्था आजही अतिशय दर्जेदार शिक्षण देत आहेत. के.के.वाघ , भुजबळ नॉलेज सिटी , संदीप फौंडेशन , सपकाळ नॉलेज हब ,प्रवरा रुरल एज्युकेशन, एस.एम,जे,बी. या महत्वाच्या व्यवसायिक संस्था आहे . सपकाळ नॉलेज हब , रासबिहारी , फ्रावसी , पोद्दार, सिल्वर ओक , अशोका , विषडम हायस्कूल , दिल्ली पब्लिक स्कूल या इंटरनशनल स्कूल येथे आहेत. बांस स्कूल ही साऊथ देवळाली येथे १८९७ मध्ये सुरु झालेली निवासी इंग्रजी माध्यामाची शाळा शहरात आहे.अलीकडच्या काळात नाशिक मध्ये अंतरराष्ट्रीय स्कूलचे प्रस्थ वाढत आहे

२.पूर्व संशोधनाचा आढावा :-

नाशिक बद्दल सामाजिक , आर्थिक , ऐतिहासिक , संस्कृती , याच्या बाबत संशोधन झाले आहे . नाशिकमधील शिक्षण व्यवस्था या बद्दल शासकीय प्रकाशने , मासिके तसेच काही ग्रंथानधून माहिती उपलब्ध होते. .

३. संशोधन समस्या :-

अश्या ऐतिहासिक, धार्मिक,सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या नाशिक शहराचा सामाजिक , आर्थिक, शैक्षणिक , विकास झपाट्याने होत असताना दिसत आहे.

४. संशोधनाची उद्धीष्टये :

सदर विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील प्रमाणे उद्धीष्ट निश्चित करण्यात आली आहे.

१. शैक्षणिक इतिहास बघत असताना नाशिकचा इतिहास अभ्यासणे.
२. शैक्षणिक क्षेत्रात काम करण्या-या विविध विभाग , संस्था यांचा सखोल अभ्यास करणे .
३. शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.
४. स्थानिक इतिहासामुळे स्थानिक पातळीवरचे ज्ञान मिळते.
५. शिक्षणाची जाणीव समाजातील सामान्य वर्गाला होण्यासाठी प्रयत्न करणे.
६. शिक्षणामुळे व्यक्ती ज्ञानी व विद्वान होतो त्यासाठी प्रयंत्न करणे.
७. ज्ञानामुळे ध्येय आणि आत्मविश्वास वाढतो त्यासाठी प्रयंत्न करणे.
८. शासनाच्या शिक्षणासाठी असणा-या योजना यांचा अभ्यास करणे .
९. राष्ट्रीय शिक्षणाचा विकास कसा होत गेला याचा अभ्यास करणे.
१०.शिक्षणामुळे मागासवर्गीय विकास कसा झाला याचा अभ्यास करणे.
११.स्त्री शिक्षणाचा विकास कसा झाला याचा अभ्यास करणे.
१२.शिक्षणामुळे समाजाला नवी दृष्टि प्राप्त होते याचा अभ्यास करणे.

सदर संशोधनात शिक्षणाचे महत्व व समाजाच्या विकासासाठी शिक्षणाचा असणारा वाटा सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

५. संशोधनाची व्याप्ती :

संशोधनाची व्याप्ती नाशिक शहर , तसेच शैक्षणिक कार्याची प्रगती व २० व्या शतका पर्यंतच व्याप्त आहे.

६.संशोधनाची मर्यादा :

नाशिकचा शैक्षणिक अभ्यास करीत असताना विषयाच्या मर्यादा विचारात घेणे गरजेचे आहे . नाशिकचा शैक्षणिक अभ्यास करीत असताना १९०० ते २००० एवढाच अभ्यास करण्यात येणार आहे .

७.स्थानिक इतिहास :

भौगोलिक स्थिती :-

तापमान:- नाशिक हे समुद्रसपाटीपासून ६०० मीटर (२००० स्के.फुट) उंचीवर आहे. गोदावरी नदीचा उगम नाशिकपासून २४ कि.मी. (15 मैल) त्र्यबकेश्वर येथे ब्रम्हगिरी पर्वतावर झाला.नाशिक हे महाराष्ट्रातील मुंबई व पुणे नंतर तिस-या क्रमांकाचे शहर आहे.

जिल्हा : मुख्य ठिकाण – नाशिक

लोकसंख्या घनता ३९३ असून देशावर सह्याद्रीला लागून पूर्वेस उत्तर मध्य महाराष्ट्रात आहे. नाशिक जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५,५३० चौ.कि.मी. आहे. जिल्ह्यातील लोकसंख्या ६१,०७,१८७ (२०११, प्राथमिक) व साक्षरतेचे प्रमाण ८२.३१ आहे. नाशिक जिल्ह्याचा पूर्व पश्चिम विस्तार सुमारे २०० कि.मी. असून दक्षिण उत्तर विस्तार सुमारे १२० कि.मी. आहे. नाशिक जिल्ह्यात १५ तालुके आहेत. नाशिक विभागात पाच जिल्ह्याचा समावेश आहे .

१. अहमदनगर २.धुळे ३.जळगाव ४.नंदुरबार ५.नाशिक

नाशिक शहराची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १४.८६ लक्ष इतकी आहे .

लोकसंस्कृती :- प्राचीन काळापासून चालत आलेली सण,उत्सव,परंपरा आजही उत्साहाने साजरे होतात. प्रत्येक शहराची एक संस्कृती असते. संस्कृती एक पिढीकडून दुस-या पिढीकडे पोहचते त्याप्रमाणे आजही नाशिक शहरात सण, उत्सव त्या पद्धतीने साजरे होताना दिसतात.

उद्योगधंदे:-

नाशिक शेती व उद्योग केंद्रापैकी महत्वाचे केंद्र आहे. आजही नाशिक शहराचा विकास वेगाने होत आहे. शहराचा जवळ सातपूर , अंबड,सिन्नर,वाडीवा-हे, गोंदे, दिंडोरी येथे उद्योग वसाहती आहेत. हिंदुस्थान एरोनटीक्श लिमिटेड , महिंद्र ,ग्लस्को, मायको , क्रोमटन ग्रीव्हज ,गरवारे, ए.बी.बी. सिमेन्स, वी.आय.पि., समसोनाईट,सिएट, किर्लोस्कर ओईल, यासारख्या अनेक नामांकित कंपन्या आहेत.शहराजवळ एकलहरे येथे औष्णक विद्युत केंद्र आहे. तसेच नाशिकरोड येथे इंडिअन करन्सी प्रेस हा नोटांचा छापखाना व इंडिया सिक्युरीटी प्रेस आहे .

नाशिक हे वाईन उत्पादनासाठी प्रसिध्द असलेले शहर आहे.येथे अनेक वाईन कंपन्या आहेत. त्यात सुलावाईन , योक वाईन , विंचूर वाईन आहे . रावळगाव येथे चॉकलेट व टोफी बनविण्याचा

कारखाना आहे. निफाड तालुक्यात -२,नाशिक तालुक्यात -१, दिंडोरी तालुक्यात -१ , कळवण तालुक्यात -१ , असे सहकारी तत्वावर चालणारे साखर कारखाने आहेत. हज मागावर पितांबर व पैठण्या तयार करण्याचा लघुउद्योग " येवला" येथे प्रचलित आहेत.

१९ एप्रिल १८१८ नाशिक शहर पेशव्याच्या हातून जाऊन ब्रिटीश साम्राज्यात गेले. १ मे १८६४ साली नाशिक नगरपालिका अस्तित्वात आली. स्वातंत्र्यापूर्वी १८७० मध्ये नाशिकला इंग्रजांनी जिल्हाचा दर्जा दिला.नाशिक महापालिकेची स्थापना ०७ नोव्हेंबर १९८२ साली झाली, नाशिकचे पहिले महापौर शांताराम बापू वावरे होते. १९०७ पर्यंत नगरपालिका ब्रिटिशांच्या ताब्यात होती. १९०८ पासून निवडून दिलेले नगरअध्यक्ष होऊ लागले.एन.वि.गोळे पहिले नगरअध्यक्ष होते. स्वातंत्रानंतर नाशिक जिल्हा निर्माण झाला तो १ मे १९६० रोजी.

८. संशोधन विषयाचे महत्त्व :

नाशिकवर आजपर्यंत भौगोलिक , आर्थिक,धार्मिक,राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक इ.बाबीवर अभ्यास झाला आहे परंतु "शैक्षणिक इतिहास" याविषयावर अभ्यास झालेला नाही. प्राचीन काळापासून शिक्षणाचे फार महत्व असलेले आपणास दिसून येते . जस जसा मानवाचा विकास होत गेला तस तसा आर्थिक,धार्मिक,राजकीय, शैक्षणिक देखील विकास होत गेला . प्राचीन काळी गुरुकुल शिक्षण पद्धती होती . विद्याथी आश्रमात जाऊन गुरुच्या आज्ञप्रमाने वेद, उपनिषद यांचा अभ्यास करीत . मध्ययुगीन काळात आपणास देवलये व मदरसा यांच्या मार्फत शिक्षण देत असल्याचे लक्ष्यात येते. आधुनिक काळात भौतिक शिक्षणावर भर देण्यात आलेला दिसून येतो. ब्रिटीश प्रशासन चालविण्यासाठी त्यांनी इग्रंजी शिक्षणावर भर दिला जेणे करून त्यांना कारकून हवे होते पण ब्रिटीशानी पारंपारिक शिक्षणाच्या ऐवजी पाश्च्यात शिक्षणावर भर दिला .

त्यामुळे भारतीय लोकांना पारंपारिक शिक्षणाबरोबर पाश्च्यात शिक्षणाचे ज्ञान मिळाले म्हणून आपला बाहेरील देशाशी संपर्क साधण्यास फार मोठी मदत झाली. शिक्षणाचे महत्त्व राजा राम मोहन रॉय , राजषी शाहू महाराज , सय्याजीराव राव गायकवाड , महात्मा ज्योतीराव फुले , सावित्रीबाई फुले , कर्मवीर भाऊराव पाटील अश्या अनेक समाजसुधारकाना त्याची जाणीव होती त्यासाठी त्यांनी फार अथक परीश्रम घेतले व सर्व सामान्यांना शिक्षण मिळावे यासाठी सतत प्रयत्न केले.

नाशिक मधील शिक्षणाचा इतिहास विषयाचा अभ्यास करताना नाशिक मधील शिक्षणाचा विकास कसा होत गेला व येणा-या पुढील काळात कुठल्या शिक्षण पद्धती व शाखा तसेच कोणत्या धोरनांची यांची आवश्यकता आहे याचा अभ्यास होण्यास मदत होईल.

९. संशोधन साहित्याचा आढावा :-

सदरचे संशोधन करण्यासाठी प्रकाशित व अप्रकाशित साधनाचा वापर करण्यात येणार आहे . सरकारी दप्तरे   फाईल , विविध वृत्तपत्रे , मासिके ,साप्ताहिक , स्मरणिका, वार्षिक अहवाल , विविधग्रंथ, ओंनलाईने प्रणाली द्वारे प्राप्त माहिती , मराठी विश्वकोश , नाशिक गेझेटर , मुलाखती या द्वारे आढाव घेण्यात येणार आहे .

१०.सैधन्तिक पार्श्वभूमी :-

सदर संशोधनासाठी उपलब्ध साधनाच्या आधारे शिक्षणा विषयीचे फायदे , सरकारी धोरणे , शिक्षणाचा समाजावर होणारा परिणाम याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे .

११.गृहीतके :-

संशोधनासाठी विधान मांडावे लागते आणि त्याद्वारे काही अनुमान काढावे लागतात ते पुढीलप्रमाणे दिसून आले .

१. शिक्षणाचा समाजावर होणारा परिणाम व त्याचे महत्व मांडण्याचा प्रयंत्न करण्यात आले आहे .
२. नाशिकला फार मोठा ऐतिहासिक , सांकृतिक , वारसा लाभला आहे त्या प्रमाणे शिक्षणाचे पण फार मोठे योगदान आहे ते सांगण्याचा प्रयत्न झाला आहे .
३. लोकसंख्येच्या प्रमाणात शैक्षणिक सुविधांचा विकास झालेला आहे का त्या गोष्टीचा अभ्यास करणे.
४. शिक्षणामुळे शहराचा विकास झालेला दिसून येतो.
५. नाशिक शहराच्या विकासात शिक्षणाचा वाटा कितपत आहे ते तपासणे.

१२.संशोधन पद्धती :-

नाशिक शहराचा शैक्षणिक इतिहास अभ्यास करीत असताना सर्वेक्षण आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे . अभ्यास करीत असतांना प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच कुठल्याही प्रकारचा पूर्वग्रह न ठेवता अभ्यास करण्याचा प्रयंत्न केला जाईल संशोधन अधिक वस्तुनिष्ठ कसे होईल याचा प्रयत्न केला जाईल.

१३.प्रकरण नियोजन :-

प्रकरण पहिले : नाशिक शहराचा भौगोलिक इतिहास .

प्रकरण दुसरे : नाशिकची पार्श्वभूमी व संक्षिप्त इतिहास.

प्रकरण तिसरे : नाशिक मधील प्राथमिक शिक्षण.

प्रकरण चौथे : नाशिक मधील माध्यमिक शिक्षण.

प्रकरण पाचवे : नाशिक मधील उच्च माध्यमिक शिक्षण.

प्रकरण सहावे : नाशिक मधील उच्च शिक्षण.

प्रकरण सातवे : निष्कर्ष.

१४. निष्कर्ष :- शिक्षण हे कोणत्याही देशाच्या प्रगतीचे गमक आहे.मानवी कल्याणाचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण होय.अज्ञात अंधारात चाचपण-या अनेक पिढया गुलामगिरी व पारतंत्र्यात बरबाद झाल्या. गरिबी दारिद्य हे त्याच्या वाटेला आले ते केवळ आज्ञानामुळे म्हणून शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही.देशाचा विकास हा त्या देशाच्या शिक्षण पद्धतीवर अवलंबून असतो म्हणूनच मी नाशिक शहराच्या विकासात भर घालणा-या शिक्षणपद्धतीचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. तसेच अजून कुठल्या शिक्षण पद्धतीची व विद्याशाखेंची गरज नाशकात आहे याचा अभ्यास करणे.

शिक्षणामुळे मानवी जीवनाचा विकास होतो तसेच व्यक्ती चा मानसिक , बौद्धिक , व आधात्मिक विकास होण्यास मदत होते . शिक्षणासाठी अनेक समाजसुधारक यांनी काम केले व आज त्याचा परिणाम आपण जागतिकस्तराचा विचार केले तर आपणांस दिसते की भारत हा अग्रगण्य देश म्हणून नावरुपाला येत आहे.

नाशिक मध्ये कुठल्याप्रकारचे शिक्षण आहे तसेच कोणत्या विद्या शाखा आहे व सामाजिक , आर्थिक , कौटुंबिकस्वास्थ राहण्यासाठी व स्पर्धेत टिकून राहण्यासाठी अजून कुठल्याप्रकारचे शिक्षण कोणत्या विद्या शाखा गरजेच्या आहे याचा अभ्यास करणे.

१५.संदर्भ ग्रंथ सूची :-

१. '' जीवन गंगा'' नाशिक नगरपालिका स्थापना व विकास , नाशिक. नगरपालिका व शहर यांची गेल्या शंभर वर्षाची वाटचाल प्रकाशित शताब्दी स्मरणिका , गावकरी प्रेस , १९६४.

२. रमेश पडवळ , तपोभूमी नाशिक एक आश्चर्य कारक शहराची गोष्ट, २०१५.

३. महाराष्ट्रातील जिल्हे, कै.सागर पब्लीकेशन.

४. "अमृतकुंभ", नाशिक-त्रंबकेश्वर सिह्स्थपर्व, , सकाळ वृत्तपत्र, पब्लीकेशन, २०१५-१६.

५. श्री.कैलास कमोद , माझ नाशिक , २०१५.

६. मराठी विश्वकोष , महाराष्ट्र साहित्य मंडळ .

७. श्री.विनायक गायधनी, परमपानांनी गोदावरी.

८. श्री.पु.दा.चंद्रात्र, जीवनधारा.

९. भारतीय इतिहास संकलन समिती , गौतमी .

१०. डॉ.सरल धारणकर,नाशिक तंत्र भूमिकडून मंत्राभूमिकडे.

११. डॉ.बा.द.चौरे, हिरक मोहस्तव १९२४-१९८४ स्मृतिग्रंथ, प्रथम आवृत्ती १९८५.

१२. श्री. वामन केशव खरे,विराम , नाशिक हायस्कूल स्मृतिग्रंथ, १९४१ .

१३. डॉ.सुधीर फडके, कर्मवीर काकासाहेब वाघ काल व कार्य, नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक , २२ जुलै १९७४.

१४. आयुक्त,नाशिक महानगरपालिका नाशिक , पत्र. जा.क्र.आस्था/वा.शि./२१२८/२०१७.,दि: ०७/१२/२०१७.

१५. www.nashik.corporation.in.

१६. maharashra.gov.in gazeleter nashik.

१७. www.maharashtra.gov.in.

१८. www.nashiknmc.co.in.

मार्गदर्शक
डॉ.डी.डी. कोल्हेकर
कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमरी
ता.उमरी,जिल्हा :-नांदेड .

संशोधक
श्री.हेमंत सुभाष भावसार